महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645

मासं/रवका/न.क्र.०५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्र. : ०२२ - २६९४२५१४१

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६८८ दिनांक १४ / ०२ / २०२५

**विषय:** लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने पारीत केलेल्या सुधारीत तरतुदी कंपनीअंतर्गत अंगीकृत करण्याबाबत.

**संदर्भ:** १. प्रशासकीय परिपत्रक क्र.६३ दि.२५.०७.२००६.
२. प्रशासकीय परिपत्रक क्र.२८४ दि.०५.०४.२०१०.
३. प्रशासकीय परिपत्रक क्र.३१७ दि.०९.११.२०१०.
४. प्रशासकीय परिपत्रक क्र.४६५ दि.११.०७.२०१३.
५. प्रशासकीय परिपत्रक क्र.६०५ दि.२२.०६.२०२०.
६. शासन निर्णय क्र. सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक दि.२४.०२.२०२३.
७. शासन निर्णय क्र.सफाई-२०२४/प्र.क्र.७०/सआक दि.१३.१०.२०२४.

*****

लाड-पागे समितीने सफाई कामगारांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी तत्कालीन परिस्थितीचा विचार करता, विशेष शिफारशी केलेल्या आहेत. सदर समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना/आदेश यांचे महावितरण कंपनीमध्ये काटेकोरपणे पालन होण्याकरिता संदर्भित परिपत्रकान्वये सूचना पारीत करण्यात आलेल्या आहेत.

२. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक दि.२४.०२.२०२३ अन्वये लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणी बाबत सर्वसमावेशक सुधारीत तरतुदी विषद करुन यापूर्वी लाड-पागे समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्कांच्या अंमलबजावणी बाबत निर्गमित करण्यात आलेले सर्व शासन निर्णय अधिक्रमित केले आहेत. तसेच शासन निर्णय क्र.सफाई-२०२४/प्र.क्र.७०/सआक दि.१३.१०.२०२४ अन्वये पूरक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

३. आता, सक्षम अधिकारी यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.सफाई २०१८/प्र.क्र.४६/सआक दि.२८.०१.२०२५ च्या अनुषंगाने उपरोक्त दि.२४.०२.२०२३ व दि.१३.१०.२०२४ या दोन्ही शासन निर्णयातील तरतुदी कंपनीअंतर्गत अंगिकृत करण्यास मंजुरी प्रदान केली आहे. यास्तव महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सफाई-२०१८/प्र.क्र.४६/ सआक दि.२४.०२.२०२३ व शासन निर्णय क्र.सफाई-२०२४/प्र.क्र.७०/ सआक दि.१३.१०.२०२४ ची प्रत अवलोकनार्थ सोबत जोडली असून, त्यामधील सर्वसमावेशक सूचना व सुधारीत तरतुदी विचारात घेउन सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या नियुक्ती संदर्भातील अंमलबजावणी बाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

४. लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार शासनाच्या धर्तीवर कंपनीअंतर्गत यापूर्वी निर्गमित करण्यात आलेली प्रशासकिय परिपत्रके व इतर सूचना याव्दारे अधिक्रमित करण्यात येत आहेत.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**सोबत :** शासन निर्णय दि.२४.०२.२०२३ व दि.१३.१०.२०२४.

( भूषण कुलकर्णी )
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (वित्त)/(संचलन)/(प्रकल्प)/(वाणिज्य)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर/कल्याण.
३) कार्यकारी संचालक (सुवअं)/ वित्त व लेखा)/(पायाभूत आराखडा/विशेष प्रकल्प)/(मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/(सांघिक वित्त)/(अंतर्गत लेखा परिक्षण/(सांघिक लेखा)/(माहिती तंत्रज्ञान)/ मुख्य विधी सल्लागार/मुख्य तपास अधिकारी/ कंपनी सचिव म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.
३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.
४) सर्व मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई. (सांघिक कार्यालय/ क्षेत्रीय कार्यालय)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं-मासंव्यप्र)/(नियोजन)/(मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत सुधारीत तरतुदी..

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांक :- सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक :- २४ फेब्रुवारी, २०२३.

<u>वाचा</u> :

१. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक-एमएससी ८०४७/१२८४९८/का-३ए, दिनांक २०.६.१९७२,
२. शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्र.युटीए १०७१/पाच/६७९८, दिनांक ९.२.१९७३,
३. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक-एमएससी १०७५/१७९०/कामगार-५, दिनांक १२.८.१९७५,
४. शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, क्र. युटीए १०७९/का-१९, दिनांक २१.६.१९७९,
५. शासन परिपत्रक, नगर विकास विभाग, क्र.संकीर्ण २२९२/प्र.क्र.१६४/९२नवि-६, दिनांक १२.१.१९९४,
६. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र बीसीसी १०९३/६९७/१६-ब, दि.१२.६.१९९५
७. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र बीसीसी २००२/१९५२/प्र.क्र.६५/१६-ब, दि.१.१०.२००३,
८. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक २०००/प्र.क्र.(१७/२०००)/१२, दि.२८.३.२००५,
९. शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र.पदनि २०११/प्र.क्र.११०/११/वि.सु.-१, दि. ३०.६.२०११
१०. शासन परिपत्रक, सा.न्या. व वि.स. विभाग क्र.सफाई-२०११/प्र.क्र.३२७/ विघयो, दि.२१.१०.२०११,
११. शासन परिपत्रक, सा.न्या. व वि.स. विभाग क्र.सफाई-२०१४/प्र.क्र.७/महामंडळे, दि.२६.२.२०१४,
१२. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अकंपा-२०१४/प्र.क्र.१६४/आठ, दि.२०.५.२०१५ ,
१३. शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.५७/२०१५/विसु.-१, दिनांक १४.१.२०१६,

**१४. शासन निर्णय, सा.न्या. व वि.स. विभाग क्र.सफाई-२०१५/प्र.क्र.२६८/महामंडळे, दि.११.३.२०१६.**

**१५. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी २०१८/प्र.क्र.२७/१६ ब (सी), दिनांक १९.४.२०१८.**

<u>**प्रस्तावना**</u> :-

सफाई कामगारांच्या विविध संघटनांच्या मागण्यांच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २२.३.२०१६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मा. मुख्यमंत्री महोदयांनी लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांचे एकत्रिकरण करुन अद्ययावत सूचना निर्गमित करण्याचे निर्देश सामान्य प्रशासन विभागास दिले होते. तथापि, लाड समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीचा विषय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून हाताळण्यात येत असल्याने, या संबंधात विविध विभागांनी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांचे एकत्रिकरण व अद्ययावतीकरण सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने करावे, असे सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १६ जुलै, २०१६ रोजीच्या बैठकीत स्पष्ट केले. त्यानुसार, तसेच सफाई कामगारांच्या वारसा हक्क प्रकरणात नियुक्ती देताना विविध प्रशासकीय विभाग/आस्थापनांना येणाऱ्या अडचणी आणि सफाई कामगारांच्या समस्यांबाबत विविध संघटनांच्या मागण्या विचारात घेवून, लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काबाबत यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले सर्व शासन निर्णय/परिपत्रके अधिक्रमित करण्यात येऊन एकत्रित नविन शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय**</u> :-

सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सफाई कामगारांना लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने वारसा हक्काने नियुक्ती देण्याबाबत खालीलप्रमाणे सुधारीत तरतुदी लागू करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे:-

१. <u>**सफाई कामगाराची व्याख्या:**</u>

लाड समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने, घाणीशी संबंधीत उदा. शौचालय स्वच्छता, घाणीशी संबंधीत मलनि:सारण व्यवस्था, नाली-गटारे, ड्रेनेज तसेच रुग्णालय व शव विच्छेदन गृहातील घाणीशी संबंधीत ठिकाणी सफाईचे काम करणाऱ्या खालील व्यक्ती -

(१) अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्ग,

(२) सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सर्व सफाई कामगार

(३) पूर्वी ज्या सफाई कामगारांनी डोक्यावरुन मैला वाहून नेण्याचे काम केले आहे, अशा सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात यावे.

मात्र सर्वसाधारणपणे रोजंदारी, कंत्राटी तत्वावरील व तसेच बाह्यस्रोताद्वारे काम करणाऱ्या व्यक्ती या योजनेंतर्गत लाभ घेण्यास पात्र असणार नाहीत.

ज्या सफाई कामगारांच्या सेवा न्यायालयीन आदेशान्वये किंवा अन्य निर्णयान्वये नियमित झाल्या आहेत त्यांना या शासन निर्णयाद्वारे वरीलप्रमाणे लाड समितीच्या शिफारशी लागु करण्यात येत आहेत. अशा प्रवर्गातील एखादया कामगाराचे पदनाम काहीही असले तरी त्या कामगारास जर उपरोक्त “सफाई कामगार” या व्याख्येत बसणारे काम दिले जात असेल तर त्यांनाही “सफाई कामगार” म्हणून संबोधण्यात यावे व त्यांना सफाई कामगाराचे सर्व लाभ देण्यात यावेत.

२. **<u>सफाई कामगारांकरीता वारसाहक्काची तरतूद:</u>**

शासकीय/निमशासकीय/महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषदा/कटकमंडळे/ राज्य शासनाची महामंडळे/ राज्य शासनाच्या स्वायत्त संस्था/ Parastatal संस्था/ अनुदानित संस्था, शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, पशुवैद्यकीय महाविद्यालये इ. आस्थापनांमधील उपरोक्त (१) येथे नमूद व्याख्येनुसार सफाई कामगारांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर, मृत्युनंतर, स्वेच्छा निवृत्तीनंतर किंवा त्यांना वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर सफाई कामगाराचे आर्थिक नुकसान होऊ नये व त्याचे कुटूंब बेघर होऊ नये आणि त्यास सामाजिक संरक्षण प्राप्त होण्याच्या दृष्टीने, लाड समितीच्या शिफारशीनुसार संबंधित सफाई कामगाराच्या जागी त्याच्या वारसाची नियमानुसार वारसा हक्काने नियुक्ती करण्याची कार्यवाही करावी.

३. **<u>वारसा हक्कास पात्र ठरणारे सफाई कामगाराचे वारस :-</u>**

सफाई कामगाराच्या वारसा हक्क प्रकरणांत पुढीलपैकी एक व्यक्ती वारस म्हणून पात्र ठरेल.

३.१ पती/पत्नी

३.२ मुलगा/मुलगी

३.३ सून / जावई

३.४ विधवा मुलगी/बहिण/घटस्फोटीत मुलगी/बहिण/परित्यक्त्या मुलगी/बहिण/ अविवाहित मुलगी /अविवाहित बहिण

३.५ सफाई कर्मचारी अविवाहीत असल्यास त्याचा “ सख्खा भाऊ/ सख्खी बहीण”

३.६ नात/ नातू

३.७ वरील पैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसापैकी कोणीही सफाईचे काम करण्यास तयार नसल्यास सफाई कामगाराचा तहहयात सांभाळ करण्याची लेखी शपथपत्राद्वारे हमी देणारी संबंधित “नामनिर्देशित व्यक्ती”.

४. **<u>सफाई कामगाराच्या वारसाची वयोमर्यादा व स्वेच्छा सेवानिवृत्तीची तरतूद :</u>**

४.१ सफाई कामगाराच्या वारस व्यक्तीची नियुक्तीसाठी वयोमर्यादा किमान वय १८ वर्षे व कमाल वय ४५ वर्षे इतकी राहील.

४.२ विशिष्ट प्रकरणात सफाई कामगाराच्या वारसाचे वय १८ वर्षापेक्षा कमी असल्यास तो ज्या दिनांकास १८ वर्षे पूर्ण करेल त्या महिन्यात अथवा तद्‌नंतर त्यास नियुक्ती देण्याची संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

४.३ सफाई कामगाराच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीसाठी सेवेची अट किमान १५ वर्षे इतकी राहील.

५. **<u>सफाई कामगाराचे नामनिर्देशन व वारसाच्या नियुक्तीसाठी अनुसरावयाची कार्यपध्दती:-</u>**

५.१ **<u>नामनिर्देशन अर्ज भरणे</u> :-** सफाई कामगार सेवेत असतानाच त्याच्याकडून विहीत विवरणपत्रात वारस म्हणून कुटूंबातील सदस्याचे नामनिर्देशन भरुन घेण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांची राहील. संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी सफाई कामगार नियुक्त झाल्यानंतर सफाई कामगारास व त्याच्या कुटूंबियांस तात्काळ वारसा हक्काबाबतची सर्व माहिती द्यावी व दिलेल्या माहितीचे प्रमाणपत्र स्वरुपात पोचपावती म्हणून त्याची नोंद नियुक्ती प्राधिकाऱ्याने ठेवावी. तसेच, नियुक्ती प्राधिकाऱ्याने यासंदर्भात नोंदवही (Master Register) ठेवावी व त्यावर संबंधित सफाई कामगाराची स्वाक्षरी /अंगठा घ्यावा. नियुक्ती प्राधिकारी यांनी संबंधित नोंदी तथा लाड समितीच्या शिफारशीचे अनुषंगाने माहिती संगणकीकृत ऑनलाईन करावी.

५.२ **<u>नामनिर्देशन करणे</u> :-** सफाई कामगाराने सेवेत असतांना/ सेवानिवृत्तीनंतर/ स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर/ वैद्यकीयदृष्टया अपात्र झाल्यानंतर वरील अ.क्र.३ मध्ये नमूद कुटूंबातील वारसांपैकी एका सदस्याच्या नियुक्तीबाबत नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे नामनिर्देशन केल्यानंतर सदर नियुक्तीकरीता इतर वारसदारांकडून संमतीपत्र घेण्याची आवश्यकता लागणार नाही. असे नामनिर्देशन २ वर्षाच्या आत करणे आवश्यक राहील.

तथापि, नामनिर्देशित व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीस नामनिर्देशित करु शकत नाही.

५.३ **<u>नामनिर्देशन करण्याचा कालावधी</u> :-** संबंधित सफाई कामगार सेवेत असतांना/ सेवानिवृत्त झाल्यावर/ स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतल्यावर/ वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर त्याच्या सेवेच्या कालावधीत त्यांने वारसाचे नामनिर्देशन केले नसल्यास त्याच्या जागी वारसाहक्काने नियुक्ती करण्याची मुदत एक वर्षाची राहील. संबंधित सफाई कामगार सेवेत असतांना/ सेवानिवृत्त झाल्यावर/ स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतल्यावर/ वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर त्याच्या सेवेच्या कालावधीत त्यांनी केलेले नामनिर्देशन केव्हाही बदलण्याची मुभा राहील. सदर बदल नोंदवून त्याची पोच संबंधित सफाई कर्मचाऱ्यास देण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याची राहील.

तसेच, नियुक्ती प्राधिकारी यांनी याची नोंद यासाठी ठेवण्यात आलेल्या (वरील परि.५.१ मधील संदर्भात) नोंदवहीत घ्यावी व उपरोक्त नोंदवहीत संबंधित सफाई कामगाराची स्वाक्षरी/अंगठा घ्यावा.

५.४ **वारसास अर्ज करण्याची मुदत** :- सेवानिवृत्त/ स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्यावर/ वैद्यकीय अपात्र झाल्यावर/ सेवेत असताना दिवंगत झाल्यावर सफाई कामगारांच्या बाबतीत संबंधित कर्मचाऱ्यास/कर्मचाऱ्याच्या कुटूंबास वारसा हक्काच्या तरतुदीबाबत सविस्तर माहिती देण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांची आहे. संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याने सदर तरतुदीबाबत संबंधित सफाई कामगार/वारस कुटूंबास अवगत केलेले नसल्यास, सेवानिवृत्त सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या प्रकरणांमध्ये संबंधित सफाई कामगाराने मुद्दा क्र. ३ येथे नमूद वारसदारांना विहीत मुदतीत अर्ज सादर करण्याची अट क्षमापित करुन, संबंधित पात्र वारसास वारसा हक्काने नियुक्ती देण्याबाबत नियुक्ती प्राधिकारी यांनी कार्यवाही करावी.

५.५ **वारसा हक्काची माहिती देणे** :- सेवानिवृत्त/ स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्यावर/ वैद्यकीयदृष्टया अपात्र झाल्यास/ सेवेत असताना दिवंगत झाल्यावर सफाई कामगारांच्या बाबतीत संबंधित कर्मचाऱ्यास/कर्मचाऱ्याच्या कुटूंबास वारसा हक्काच्या तरतुदीबाबत सविस्तर माहिती देण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांची राहील. संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याने सदर तरतुदीबाबत संबंधित सफाई कामगार/ वारस कुटूंबास अवगत केलेले नसल्यास, सेवानिवृत्त सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या प्रकरणांमध्ये संबंधित सफाई कामगाराने मुद्दा क्र. ३ येथे नमूद केल्यानुसार वारसदारांना विहीत मुदतीत अर्ज सादर करण्याची अट क्षमापित करुन, संबंधित पात्र वारसास वारसा हक्काने नियुक्ती देण्याबाबत संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी कार्यवाही करावी.

५.६ **वैद्यकीय कारणास्तव कर्मचारी अपात्र ठरल्यास** :- सफाई कामगार सेवेत असताना त्यास अपघात झाल्यास अथवा शारीरिक अपंगत्व आल्यास किंवा मानसिक आजार, क्षयरोग, कर्करोग इ.मुळे तो काम करण्यास असमर्थ/ अपात्र ठरल्यास व त्याने शासकीय रुग्णालयाच्या संबंधित जिल्हा शल्य चिकित्सकाचे विहीत प्रमाणपत्र सादर केल्यास संबंधित सफाई कामगाराचा सेवा कालावधी कितीही झाला असला तरी त्याच्या पात्र वारसास वारसा हक्काचा लाभ देण्यात यावा.

५.७ **सफाई कामगारास कोणीही पात्र वारस नसेल तेव्हा** :- सफाई कामगाराच्या सेवानिवृत्तीनंतर संबधितास वारसाहक्कानुसार नियुक्ती मिळण्यापुर्वी सफाई कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या वारसाहक्कामध्ये बाधा येणार नाही.तसेच त्या कामगाराने मृत्युपुर्वी दिलेले संमतीपत्र ग्राह्य राहील आणि त्यानुसार त्याच्या वारसास/नामनिर्देशित व्यक्तीस नियुक्ती देण्यात येईल.जर सफाई कामगाराने मृत्युपुर्वी

नामनिर्देशन दिले नसेल तर अशा विशिष्ठ प्रकरणात नामनिर्देशन देण्याचा अधिकार त्याच्या पत्नी/पतीस राहील. तथापि, पती/पत्नी हयात नसल्यास नामनिर्देशनाचे अधिकार कुटुंबियास राहतील.

५.८ **<u>सफाई कामगाराच्या कुटूंबातील सेवेत असणाऱ्या वारसांच्या नियुक्तीबाबत :-</u>** सफाई कामगाराच्या कुटुंबातील पती/पत्नी किंवा मुलगा/मुलगी इ.व्यक्ती अथवा अन्य व्यक्ती शासकीय/ निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या/ अनुदानित संस्थेच्या सेवेत असल्यास, संबंधित सफाई कामगाराच्या वारस हक्काच्या नियमास बाधा येणार नाही.

६. **<u>सफाई कामगाराच्या पदोन्नतीनंतर वारसा हक्काची तरतूद:</u>**

६.१ सफाई कामगार नोकरी करीत असताना त्याला भरतीने/पदोन्नतीने/ बदलीने निवडीने/खात्याअंतर्गत चतुर्थ श्रेणीत वा तत्सम/समकक्ष पदावर नियुक्ती केल्यास वारस हक्काच्या नियमास बाधा येणार नाही.

६.२ सफाई कर्मचारी वर्ग-३ मध्ये पदोन्नतीस पात्र झाल्यास त्यास, बिंदूनामावली (roster ) प्रमाणेच पदोन्नती देणे आवश्यक राहील.

६.३ मात्र, सफाई कामगार सेवेत असताना त्याला गट-क, मध्ये पदोन्नती मिळाल्यास, अशा सफाई कामगाराच्या वारसास, वारसा हक्काची तरतूद लागू राहणार नाही.

६.४ लाड व पागे समितीने शिफारस केल्यानुसार शासकीय / निमशासकीय मंडळे / महामंडळे/ स्वायत्त संस्था/ महानगरपालिका/ नगरपालिका/ खाजगी संस्था, शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, पशुवैद्यकीय महाविद्यालये तसेच कारखाने इत्यादीच्या आस्थापनेवर मेहतर व वाल्मिकी किंवा सफाई कामगार नोकरभरती करताना त्याच्या वारसास/जवळच्या नातेवाईकास प्राधान्य देण्यात येते ते यापुढेही चालू ठेवावे, याबाबत आवश्यकता भासल्यास सेवाप्रवेशातील नियम व लाड पागे शिफारशीची तरतुदी शिथिल करुन त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी.

७. **<u>सफाई कामगाराच्या वारसास शैक्षणिक अर्हतेनुसार नियुक्ती:-</u>**

७.१ शासकीय/निमशासकीय/महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषदा/कटकमंडळे (कंटेनमेंट बोर्ड) राज्य शासनाची महामंडळे/ राज्य शासनाच्या स्वायत्त संस्था/ Parastatal संस्था/ अनुदानित संस्था शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, पशुवैद्यकीय महाविद्यालये इत्यादी आस्थापनेच्या सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील ज्येष्ठता यादीतील सफाई कामगाराच्या वारसास त्याची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्याआधारे त्यांची नेमणूक वर्ग-४ किंवा वर्ग-३ मध्ये करावी.

७.२ नियुक्ती प्राधिकारी यांनी अशी कार्यवाही करताना संबंधित सफाई कामगाराचा वारस हा वर्ग-३ वा वर्ग-४ मधील कोणत्याही पदासाठी शैक्षणिक अर्हता प्राप्त करीत असल्यास त्याची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्यानुसार त्यास वर्ग-३ वा वर्ग-४ च्या पदावर

नियुक्ती देण्याची कार्यवाही करावी. मात्र वर्ग ३ चे पद उपलब्ध असल्यास व संबंधित वारसाची इच्छा असल्यास त्याला प्राधान्याने वर्ग ३ च्या पदावर नियुक्ती दयावी.

७.३ एखाद्या सफाई कामगाराचा वारस हा वर्ग-३ तसेच वर्ग-४ च्या पदासाठी शैक्षणिक अर्हतेनुसार पात्र ठरत असेल आणि त्याने वर्ग-३ च्या पदासाठी इच्छुकता दर्शविली असेल, मात्र संबंधित कार्यालयात वर्ग-३ चे पद रिक्त नसेल तर संबंधित वारसास भविष्यात वर्ग-३ च्या रिक्त पदावर नियुक्ती मिळण्याच्या अधिन राहून वर्ग-४ मधील रिक्त पदावर वारसा हक्काने नियुक्ती देण्यात यावी व तसे नियुक्ती आदेशात नमूद करावे.

७.४ <u>सफाई कामगाराच्या वारसास त्याच्या</u> शैक्षणिक अर्हतेनुसार लिपीक-टंकलेखक या वर्ग-३ (गट-क) च्या पदावर नियुक्ती द्यावयाची झाल्यास आणि संबंधित सफाई कामगाराच्या वारसाकडे विहीत वेगमर्यादेचे टंकलेखन ( पदाच्या शैक्षणिक अर्हतेनुसार) MS-CIT अर्हता प्रमाणपत्र नसल्यास, असे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी त्यास संदर्भ क्र.६ दिनांक २०.५.२०१५ च्या विभागाच्या शासन निर्णयानुसार दोन वर्षापर्यंत मुदत देण्यात यावी. यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने वेळोवळी निर्गमित केलेले शासन निर्णय / परिपत्रके लागू राहतील.

८. **<u>सफाई कामगाराच्या वारसा हक्कासंबंधात इतर तरतुदी :-</u>**

८.१ शासकीय सेवेतील गट-अ, ब, क व ड मधील पद भरतीचे विनियमन करण्याच्या बाबतीतील, शासकीय सेवेतील गट-अ, ब, क व ड मधील पदाच्या नियुक्तीसाठी "लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र" सादर करण्याची अतिरिक्त अट सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भीय दिनांक २८.३.२००५ च्या शासन अधिसूचने अन्वये विहीत केलेली आहे. सदर अट ही सफाई कामगाराच्या वारसाच्या नियुक्तीस सुध्दा लागू राहील. तसेच, यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने वेळोवळी निर्गमित केलेले शासन निर्णय/ परिपत्रके लागू राहतील.

८.२ शासकीय/ निमशासकीय/ महानगरपालिका/ नगरपालिका/ नगरपरिषदा/ कटकमंडळे/ राज्य शासनाची महामंडळे/ राज्य शासनाच्या स्वायत्त संस्था/ Parastatal संस्था/ अनुदानित संस्था, शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, पशुवैद्यकीय महाविद्यालये इ. संस्थांमधील वारसा हक्काच्या रिक्त जागा भरताना सेवानिवृत्त/ स्वेच्छासेवानिवृत्त/वैद्यकीयदृष्टया अपात्र झालेल्या किंवा दिवंगत झालेल्या सफाई कामगारांच्या जागी त्यांच्या वारसास नियुक्ती देण्यात येत असल्याने एकूण कर्मचाऱ्यांची संख्या वाढत नाही. त्यामुळे आस्थापना खर्चाच्या मर्यादेची अट आणि आकृतीबंधाची अट सफाई कामगाराच्या वारसा हक्कांच्या प्रकरणात लागू राहणार नाही. तसेच सफाई कामगारांची पदे रिक्त झाल्यास ती लाड समितीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने भरण्यात येत असल्याने, सफाई कामगारांची पदे व्यपगत होणार नाहीत.

८.३ सफाई कामगारांच्या वारसा हक्काद्वारे करण्यात येणाऱ्या नियुक्तीच्या प्रकरणांना वित्त विभागाचे पदभरतीचे निर्बंध लागू राहणार नाहीत.

८.४ सफाई कामगाराच्या वारसास नियुक्ती देण्यापूर्वी संबंधित वारसाचे जात वैधता प्रमाणपत्र संबंधित कार्यालयाने प्राप्त करुन घ्यावे. यासंदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने वेळोवळी निर्गमित केलेले शासन निर्णय / परिपत्रके लागू राहतील.

८.५ महानगरपालिका, नगरपालिका, नगर परिषदा व नगर पंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समिती, कटक मंडळे अथवा अन्य स्थानिक स्वराज्य संस्था सफाई कामगाराच्या वारसास वारसा हक्काने नियुक्ती देताना सर्वसाधारण सभा व स्थायी समितीच्या मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

८.६ वारसा हक्काची प्रकरणे संबंधित सफाई कामगार सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त/ वैद्यकीयदृष्टया अपात्र वा मयत झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत निकाली काढण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांच्यावर बंधनकारक राहील. असे प्रकरण निकाली काढण्यास संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांना अडचण उद्भवल्यास, आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह सविस्तर प्रस्ताव आठ दिवसांत संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे पाठविण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांची राहील असे प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागाकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ३० दिवसांच्या आत त्यावर निर्णय घ्यावा.

८.७ शिक्षा म्हणून सफाई कर्मचाऱ्यास बडतर्फ वा शासकीय सेवेतून काढून टाकले असल्यास त्याच्या वारसांना वारसा हक्क नियुक्तीचा लाभ देण्यात येऊ नये.

८.८ सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी प्रस्तुतचे निर्देश त्यांच्या अधिनस्थ कार्यालयांच्या निदर्शनास आणून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना त्यांच्या अधिनस्थ असलेले नियुक्ती प्राधिकारी यांना द्याव्यात.

८.९ सफाई कामगारांची आर्थिक स्थिती सबळ नसल्यामुळे त्यांच्या कुटुंबांना नोकरीची व राहण्याची शाश्वती मिळणे अत्यंत आवश्यक आहे . सफाई कामगाराच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देण्यासाठी निर्गमित केलेल्या आदेशांची/सूचनांची अंमलबजावणी करण्यास शासकीय, निमशासकीय आस्थापना, महानगरपालिका, नगरपालिका/नगर परिषदा/नगर पंचायती, कटक मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे/महामंडळे, स्वायत्त संस्था/अनुदानित संस्था, शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, पशुवैद्यकीय महाविद्यालये इत्यादी आस्थापनांमधील अधिकारी वा कर्मचारी हेतूपुरस्सर टाळाटाळ, कुचराई, दिरंगाई करीत असल्याची बाब निदर्शनास आल्यास त्यांच्या विरुध्द संबंधित नियुक्ती प्राधिकारी/शिस्तभंग विषयक प्राधिकारी यांनी संदर्भीय सामान्य प्रशासन विभाग दिनांक १२.०६.१९९५ च्या शासन निर्णयानुसार संबंधितांविरुध्द

तात्काळ शिस्तभंगाची कारवाई करावी. तसेच, यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय / परिपत्रके लागू राहतील.

८.१० सफाई कामगारांच्या जागी त्याचा वारस लागत असल्यामुळे अशा सफाई कामगारांना कायमस्वरुपी मोफत मालकी हक्काची घरे देण्याबाबत नियमानुसार त्वरीत निर्णय घेण्याबाबत नगर विकास विभाग, ग्राम विकास विभाग, गृहनिर्माण विभाग व इतर संबंधित विभागांनी निर्णय घ्यावा.

८.११ या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसंदर्भात शक्यतोवर संबंधित नियुक्ती प्राधिकारी तथा संबंधित शासकीय विभाग यांनी त्यांच्या स्तरावरच निर्णय घ्यावा. संबंधित प्रशासकीय विभागास लाड समितीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीसंदर्भात संभ्रम निर्माण झाल्यास प्रकरणपरत्वे निर्णय घेण्यासाठी संबंधित प्रकरणी प्रस्ताव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अभिप्रायाकरीता सादर करावा.

९. यासंदर्भातील यापूर्वीचे सर्व शासन निर्णयपरिपत्रक या शासन निर्णयान्वये अधिक्रमित / .करण्यात येत आहेत

१०.सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०२२४१८३८५६०७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ASHWINI BHIMRAO YAMGAR

Digitally signed by ASHWINI BHIMRAO YAMGAR
Date: 2023.02.27 11:45:08 +05'30'

**(अश्विनी यमगर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व मा.मंत्री/सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. विधानमंडळाच्या सर्व समित्यांचे प्रमुख, विधानमंडळ, मुंबई,
५. मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य, विधानमंडळ, मुंबई,
६. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ/अपील शाखा), मुंबई,
११. प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त, मुंबई,
१२. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१३. सर्व विभागीय आयुक्त, महसूली विभाग,

१४. आयुक्त, समाजकल्याण, पुणे,
१५. आयुक्त, अपंग कल्याण संचालनालय, पुणे,
१६. आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई,
१७. मुख्य अभियंता, सा.बां. मंडळ, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई,
१८. प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
२०. महासंचालक आणि पोलिस महानिरीक्षक,महाराष्ट्र राज्य, महासंचालक,
२१. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे,
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
२३. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र संचालनालय, मुंबई,
२४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२५. शिक्षण संचालक (माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२६. संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई,
२७. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई,
२८. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
२९. सर्व जिल्हाधिकारी,
३०. आयुक्त, सर्व महानगर पालिका,
३१. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,
३२. मुख्याधिकारी, सर्व नगर परिषदा,
३३. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण,
३४. सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण,
३५. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
३६. सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
३७. सर्व सह/उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, सा.न्या. व वि.स. विभाग, मंत्रालय, मुंबई,
३८. निवडनस्ती/ अजाक (सआक).

*****

लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत दि.२४.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये विहीत सुधारीत तरतुदी दि.२४.०२.२०२३ पूर्वीच्या प्रलंबित प्रकरणांना लागू करणेबाबत...

# महाराष्ट्र शासन

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक :- सफाई-२०२४/प्र.क्र.७०/सआक,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक :- १३ ऑक्टोबर , २०२४.

**वाचा :**

१. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग पत्र क्र.संकीर्ण-२००८/यादी/प्र.क्र.५५३/मावक-५, दिनांक २६.०९.२००८.
२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग पत्र क्र.संकीर्ण-२००८/यादी/प्र.क्र.५५३/मावक-५, दिनांक १५.०४.२०१०.
३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक-सफाई-२०१८ /प्र.क्र. ४६ /सआक, दिनांक २४.०२.२०२३.
४. मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे रिट याचिका क्रमांक ३९५०/२०२३ (श्री. कैलास मारोती राजकौर व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन) प्रकरणी दिनांक १०.०४.२०२३ चे आदेश.
५. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक - सफाई- २०२४ / प्र.क्र. १६ /सआक, दिनांक ११.०३.२०२४.
६. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन सुधारणा / शुद्धीपत्रक क्रमांक- सफाई/ २०२४ - प्र.क्र. १६ /सआक, दिनांक ११.०३.२०२४.
७. मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे रिट याचिका क्रमांक ३९५०/२०२३ मधील सिव्हील ॲप्लिकेशन क्रमांक १५४३४ / २०२३ व इतर न्यायालयीन प्रकरणी दिनांक २४.०६.२०२४ चे आदेश.

<u>प्रस्तावना</u> :-

लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत संदर्भ क्र. ३ येथील दिनांक २४.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये सुधारित तरतुदी विहित करण्यात आल्या आहेत. तथापि, सदर शासन निर्णयान्वये त्यापूर्वीचे निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय / परिपत्रके अधिक्रमित करण्यात आल्याने सफाई कामगारांच्या

वारसा हक्क प्रकरणात नियुक्ती देताना विविध प्रशासकीय विभाग/ आस्थापनांना अडचणी येत असल्याने तसेच, त्याबाबत सफाई कामगारांच्या विविध संघटनांच्या तसेच, लोकप्रतिनिधींच्या मागण्या विचारात घेवून दि.२४.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये विहीत सुधारीत तरतुदी सन १९७५ ते दि.२३.०२.२०२३ या कालावधीतील प्रलंबित प्रकरणांना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे :

अ. संदर्भ क्र. ३ येथील दि.२४.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या तरतुदी दि. १२.०८.१९७५ ते दि.२३.०२.२०२३ या कालावधीतील सर्व प्रलंबित प्रकरणांना लागू राहतील.

आ. तसेच,संदर्भ क्र. ५ येथील दि.११.०३.२०२४ च्या शासन निर्णयान्वये संदर्भ क्र.१ येथील दि.२६.०९.२००८ व संदर्भ क्र.२ येथील दि.१५.०४.२०१० च्या शासन पत्रान्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग या यादीतील अनु.क्र.१२ वरील ओलगाना,रुखी,मलकाना,हलालखोर,लालबेगी,कोरार,झाडमल्ली व हेला या जाती/उपजातींमधील तसेच अनु.क्र.१९ वरील डोम,डुमार या जातींमधील उमेदवारांना संदर्भ क्र.३ येथील दि.२४.०२.२०२३ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीचे तसेच मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांचेकडून काटेकोरपणे पालन करण्यात येईल या अटीच्या अधीन वारसा हक्काने नियुक्ती देण्यास शासन मान्यता देण्यात आली असून सदर संदर्भ क्र. ५ येथील दि.११.०३.२०२४ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेल्या तरतूदी दि. १२.०८.१९७५ ते दि.२३.०२.२०२३ या कालावधीतील सर्व प्रलंबित प्रकरणांनाही लागू राहतील.

इ. याव्यतिरिक्त,संदर्भ क्र. ६ येथील दि.११.०३.२०२४ च्या सुधारणा / शुध्दीपत्रकान्वये संदर्भ क्र.३ येथील दि.२४.०२.२०२३ च्या शासन निर्णयातील अनु.क्र.३ मधील वारसा हक्कास पात्र ठरणारे सफाई कामगारांचे वारस या सदरात सफाई कर्मचा-याच्या विवाहीत मुलीचा समावेश करण्यात आला असून अनु.क्र.८ मधील सफाई कामगारांच्या वारसा हक्कासंबंधात इतर तरतुदीमधील अनु.क्र.८.१ मधील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र देण्याची अतिरिक्त अट तसेच अनु.क्र.८.४ मध्ये नमूद नियुक्ती देण्यापूर्वी जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची अट वगळण्यात आली आहे. सदर संदर्भ क्र. ५ येथील दि.११.०३.२०२४ च्या सुधारणा / शुध्दीपत्रकान्वये विहीत करण्यात आलेल्या तरतूदी दि. १२.०८.१९७५ ते दि.२३.०२.२०२३ या कालावधीतील सर्व प्रलंबित प्रकरणांनाही लागू राहतील.

ई. ज्या प्रलंबित प्रकरणांत नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी वारसदारांना विहित मुदतीत अर्ज सादर करण्याबाबत माहिती दिली नाही अशा प्रकरणांत विहित मुदतीत अर्ज सादर करण्याची अट संबंधित प्रशासकीय विभागाच्या मान्यतेने क्षमापित करुन संबंधित पात्र वारसास वारसा हक्काने नियुक्ती देणेची संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी कार्यवाही करणे आवश्यक राहील. तसेच ज्या प्रकरणांत जाणीवपूर्वक विलंब करण्यात आलेला आहे.अशा प्रकरणांत सक्षम प्राधिकारी यांनी विलंबास जबाबदार असणा-या संबंधितांविरुध्द शासन विहीत नियमांनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

उ. मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी संदर्भ क्र. ४ येथील दि. १०.०४.२०२३ व संदर्भ क्र. ७ येथील दि. २४.०६.२०२४ रोजी दिलेल्या आदेशाचे अवलोकन करता सदर सुधारणा या मेहतर,वाल्मिकी व भंगी समुदाय व त्यानुषंगाने वर अ.क्र. "आ" व "इ" येथे नमूद जाती/उपजाती तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द यांनाच लागू राहतील.

ऊ. ज्या वारसा हक्काच्या नियुक्ती प्रकरणांत शासनाने यापूर्वी मार्गदर्शन केले आहे, अशा सर्व प्रकरणांत शासनाने दिलेल्या मार्गदर्शनानुसार नियुक्ती प्राधिकारी यांनी शासनास पुन्हा संदर्भ न करता पुढील कार्यवाही करणे आवश्यक राहील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२४१०१३१५५२२९९४२२ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

SUNITA VIRENDRA GAIKWAD

Digitally signed by SUNITA VIRENDRA GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOCIAL JUSTICE AND SPECIAL ASSISTANCE DEPARTMENT, 2.5.4.20=d31fff582bcd0471a184e5d4bae4b75ca3348053d0eb588b97308bad1ac67a40, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7B3D0DDAE7B5F68C71F56026F5D7EB976A590FFF12E613DAC6FD709B6C801646, cn=SUNITA VIRENDRA GAIKWAD
Date: 2024.10.13 16:23:57 +05'30'

**( सुनिता गायकवाड )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधानसभा,
४. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. विधानमंडळाच्या सर्व समित्यांचे प्रमुख, विधानमंडळ, मुंबई,
६. मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य, विधानमंडळ, मुंबई,
७. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
८. सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१०. प्रबंधक, मा. उच्च न्यायालय (मूळ/अपील शाखा), मुंबई,
११. प्रबंधक, मा. लोकआयुक्त व उप लोकआयुक्त, मुंबई,

१२. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१४. सर्व विभागीय आयुक्त, महसूली विभाग,
१५. आयुक्त, समाजकल्याण, पुणे,
१६. आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे,
१७. आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई,
१८. मुख्य अभियंता, सा.बां. मंडळ, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई,
१९. प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
२१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,
२२. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे,
२३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
२४. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र संचालनालय, मुंबई,
२५. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२६. शिक्षण संचालक (माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२७. संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई,
२८. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई,
२९. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
३०. सर्व जिल्हाधिकारी,
३१. आयुक्त, सर्व महानगर पालिका,
३२. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,
३३. मुख्याधिकारी, सर्व नगर परिषदा,
३४. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण,
३५. सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण,
३६. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
३७. सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
३८. सर्व सह/उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, सा.न्या. व वि.स. विभाग, मंत्रालय, मुंबई,
३९. निवडनस्ती/ सआक.

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**मंत्रालय (विस्तार इमारत), १ ला मजला, मादाम कामा मार्ग,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२**

---

**क्रमांक-सफाई २०१८/प्र.क्र.४६/सआक** **दिनांक : २८ जानेवारी, २०२५**

**प्रति,**

**१. अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,**
**२. सर्व आयुक्त, महानगरपालिका,**
**३. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद संचालनालय, बेलापूर, नवी मुंबई,**
**४. आयुक्त, समाजकल्याण, पुणे.**

**विषय** - लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्कांच्या अंमलबजावणीबाबत दि.२४.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या तरतुदीबाबत मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही.

**संदर्भ-** १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक-सफाई २०१८/प्र.क्र.४६/सआक, दिनांक २४/०२/२०२३,
२) मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद, येथे दाखल रिट याचिका क्र.३९५०/२०२३ (श्री.कैलाश मारोती राजकौर व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन) प्रकरणी आदेश दिनांक १०/४/२०२३,
३) या विभागाचे पत्र क्र.सफाई २०२३/प्र.क्र.४७/सआक, दिनांक ७/८/२०२३,
४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक-सफाई २०२४/प्र.क्र.१६/सआक, दिनांक ११/३/२०२४,
५) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सुधारणा/शुध्दीपत्रक क्रमांक-सफाई २०२४/प्र.क्र.१६/सआक, दिनांक ११/३/२०२४,
६) मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे रिट याचिका क्र.३९५०/२०२३ मधील सिव्हिल ॲप्लीकेशन क्र.१५४३४/२०२३ व इतर न्यायालयीन प्रकरणी आदेश दिनांक २४/६/२०२४,
७) या विभागाचे पत्र क्र.न्यायाप्र २०२३/प्र.क्र.४८/सआक, दिनांक १२/७/२०२४.
८) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक-सफाई २०२४/प्र.क्र.७०/सआक, दिनांक १३/१०/२०२४,
९) मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद, यांचे रिट याचिका क्र.३२०४/२०२३ (श्री.गोरोबा राम आरदवाड व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन) तसेच इतर संबंधित न्यायालयीन प्रकरणी आदेश दिनांक ०८/०१/२०२५.

महोदय,

उपरोक्त विषयांकित प्रकरणी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांच्या संदर्भ क्र.९ येथील दिनांक ०८/०१/२०२५ च्या आदेशांचे कृपया अवलोकन व्हावे. (प्रत संलग्न)

२. या विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील दिनांक दि.२४.२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये सफाई कामगारांच्या वारसा हक्क प्रकरणात नियुक्ती देताना विविध प्रशासकीय विभाग / आस्थापनांना येणाऱ्या अडचणी आणि सफाई कामगारांच्या समस्यांबाबत विविध संघटनांच्या मागण्या विचारात घेवून, लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काबाबत यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले सर्व शासन निर्णय/परिपत्रके अधिक्रमित करण्यात येऊन एकत्रित सुधारीत तरतुदी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. परंतु सदर शासन निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र. ३२०४/२०२३ (श्री. गोरोबा आरदवाड विरूद्ध महाराष्ट्र शासन) व रिट याचिका क्र. ३९५०/२०२३ (श्री. कैलाश राजकौर व इतर विरूध्द महाराष्ट्र शासन) दाखल करण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद यांनी न्यायालयीन रिट याचिका क्र. ३९५०/२०२३ श्री. कैलाश राजकौर व इतर विरूध्द महाराष्ट्र शासन प्रकरणी दि.१०/०४/२०२३ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले होते.

In view of the above and considering the law laid down by the Hon'ble Supreme Court in Ahmednagar Mahanagar Palika V Ahmednagar Palika Kamgar Union(2022) 10 SSC 172, we direct that the State Government would refrain from extending the benefits of the Government Resolution dated 24th February, 2023 until further orders, save and except to the legal heirs of the those employees, who belong to Walmiki, Mehtar and Bhangi communities.

मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशान्वये वाल्मिकी, मेहतर व भंगी या जाती प्रवर्गातील सफाई कामगारांच्या पात्र वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देण्यापासून सूट देण्यात आली असून या प्रवर्गाव्यतिरिक्त इतर जाती प्रवर्गातील सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देण्यास तात्पुरती स्थगिती दिलेली होती. सदर आदेश राज्यातील सर्व आयुक्त, महापालिका तसेच आयुक्त तथा संचालक महानगरपालिका प्रशासन यांना या विभागाच्या संदर्भ क्र.३ येथील दिनांक ०७/०८/२०२३ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेले असून, त्यानुषंगाने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

३. त्याचबरोबर शासन पत्र दिनांक २६.९.२००८ व दिनांक १५.४.२०१० अन्वये महाराष्ट्र राज्याची अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग यांची यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर यादीतील अनुसूचित जातीतील अनु.क्र.१२ मध्ये भंगी, मेहतर, वाल्मीकी यांच्या सोबत ओलगाना, रुखी, मलकाना, हलालखोर, लालबेगी, कोरार, झाडमल्ली व हेला या जाती/ उपजातींचा समावेश करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर मा. उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेश व सदर जाती / उपजाती या वाल्मीकी, मेहतर व भंगी समुदायातील असल्याने व अनु.क्र.१९ वरील डोम,डुमार या जातीमधील उमेदवारांना दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीचे आणि मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांचेकडून काटेकोरपणे पालन करण्यात येईल या अटीच्या अधीन वारसा हक्काने नियुक्ती देण्यास संदर्भ क्र.४ येथील दिनांक ११/०३/२०२४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ क्र.५ येथील सुधारणा/शुध्दीपत्रक दिनांक ११/०३/२०२४ अन्वये पात्र वारसदारांच्या यादीमध्ये सफाई कर्मचा-यांच्या विवाहीत मुलीचा समावेश करण्यात आलेला असून नियुक्ती देण्यापूर्वी जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याची अट वगळण्यात आलेली आहे.

४. त्याचप्रमाणे प्रस्तुत प्रकरणी दिनांक २४ जून, २०२४ च्या आदेशान्वये मा. उच्च न्यायालयाने विविध निरिक्षणे नोंदवली आहेत, त्याचा थोडक्यात तपशील पुढीलप्रमाणे आहे —

We have noticed from the report of 1974 that the Scheduled Castes were also included for the benefit of the Laud Committee recommendations. The Page Committee recommendations, in addition, suggested that the persons belonging to such categories should be given some security of employment even for their future generations. It is in the light of the said 1974 report that we are permitting the Government to include the category of Scheduled Caste, including 'Navbaudhha', along with the Walmiki, Mehtar and Bhangi communities, in our directions issued in paragraph No.4 of our order dated 10.04.2023. The Scheduled Caste category has also been included by the State in it's Government Resolution dated 24.02.2023. In the event any such 'Varas hakka' holder falling in the category of Scheduled Caste has become age barred in view of our order dated 10.04.2023, there shall be

relaxation in such cases since our order should not result into taking away rights of a person, who has a claim in view of the Laud-Page Committee recommendations.

मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशान्वये वाल्मिकी, मेहतर व भंगी या जाती प्रवर्गातील कर्मचा-यासोबत अनुसूचीत जाती व नवबौध्द प्रवर्गातील सफाई कर्मचा-यांचा समावेश केलेला आहे. त्या अनुषंगाने या विभागाच्या संदर्भ क्र.७ येथील दिनांक १२/७/२०२४ च्या पत्रान्वये सर्व संबंधितांना कार्यवाही करण्याचे कळविले आहे.

५. लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत संदर्भ क्र.१ येथील दिनांक २४/०२/२०२३ च्या शासन निर्णयान्वये विहीत सुधारीत तरतुदी दिनांक १२/८/१९७५ ते दिनांक २३/२/२०२३ या कालावधीतील सर्व प्रलंबित प्रकरणांना संदर्भ क्र.८ येथील दिनांक १३/१०/२०२४ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

६. प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने संदर्भ क्र.९ अन्वये दिनांक ०८/०१/२०२५ रोजी आदेश पारीत केलेले असून सदर आदेशाचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे आहे -

We expect the appointing authorities of the establishments should follow Government Resolution dated 24/02/2023. The individual claims should be considered objectively. We are therefore passing following directions in all petitions:-

(i) The appointments and claims to the post of Safai Kamgar shall be regulated by Government Resolution dated 24.02.2023 which shall be implemented by the Employers, Appointing Authorities or the Competent Authorities of the Establishments.

(ii) The Appointing Authorities, Employers, or the Competent Authorities of the Establishments shall conduct objective scrutiny of individual claims of the Petitioners expeditiously in accordance with the Government Resolution dated 24.02.2023.

(iii) The Petitioners or the Intervenors shall be at liberty to submit their applications before the Appointing Authorities, Employers or the Competent Authorities of the Establishments, if not submitted earlier.

(iv) The Appointing Authorities, Employers, or the Competent Authorities of the Establishments shall conduct objective scrutiny of the claims and extend the opportunity to submit relevant documents to the Claimants and decide the individual claims within period of six weeks from the date of receipt of the applications.

(v) In case of rejection of the claims, it shall be open to resort to the remedy as permissible in law.

७. सबब, उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे संदर्भ क्र.९ येथील दिनांक ०८/०१/२०२५ चे आदेश विचारात घेऊन तसेच संदर्भ क्र.१ येथील दिनांक २४/०२/२०२३ च्या शासन निर्णयान्वये तसेच त्यानुषंगाने वेळोवेळी विहीत केलेल्या संदर्भाधीन शासन निर्णयांस व सुधारणा/ शुध्दीपत्रकातील तरतुदींस अनुसरुन तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

28/03/2025

(रविंद्र गोरवे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन